**शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांनी विनिर्दिष्ट कालावधीसाठी शासन सेवा करणे अनिवार्य असल्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमईडी-१००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ८ फेब्रुवारी, २००८

**वाचा** :-
१) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एनओसी-३०९५/ सीआर-३०७/९५/शिक्षण-१, दि. २८ फेब्रुवारी, १९९६.
२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. पीजीएम-१३९७/ सीआर-८/पार्ट-३/१५०/शिक्षण-१, दि. १९ जानेवारी, १९९८
३) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. पीजीएम-१३९७/ सीआर-८/पार्ट-३/१५०/शिक्षण-१, दि. ६ फेब्रुवारी, १९९८.
४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. पीजीएम १३०१/ ४०६५/सीआर-४१८/२००१/शिक्षण-१, दि. २० नोव्हेंबर, २००१
५) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. पीजीएम १००४/ सीआर-६३३/०४/शिक्षण-२, दि. ११ मार्च, २००५
६) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एमईडी १००६/ सीआर-५/०६/शिक्षण-२, दि. ३१ जुलै, २००६

**प्रस्तावना**

शासकीय अथवा महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासनाकडून/महानगरपालिकेकडून मोठया प्रमाणावर खर्च केला जातो. या खर्चाच्या तुलनेत विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येत असलेले शैक्षणिक शुल्क अत्यल्प आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासन/महानगरपालिका करीत असलेला खर्च हा जनतेकडून आकारण्यात येत असलेल्या कराच्या उत्पन्नातून भागविला जात असल्याने जनतेच्या ऋणांची काही अंशी परतफेड व्हावी या उददेशाने पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/संरक्षण दलाची सेवा करण्याबाबतचे बंधपत्र लिहून घेण्यात येते. तसेच उपरोक्त संदर्भामध्ये क्र. ६ येथे नमूद केलेल्या शासन निर्णय दि. ३१ जुलै, २००६ अन्वये शासकीय व महानगरपालिकेच्या

महाविद्यालयातून एमबीबीएस अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना शासकीय व महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयातून पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणा-या प्रवेश परीक्षेस बसण्याकरिता पात्र ठरण्यासाठी विशिष्ट कालावधीची शासन सेवा त्याने पूर्ण केली असली पाहिजे. अन्यथा बंधपत्रानुसार दंडाची रक्कम भरणे आवश्यक राहील, अशी अट घातली आहे. बंधपत्रानुसार उमेदवाराने करावयाच्या शासन सेवेचा कालावधी, बधंपत्राचे उल्लंघन झाल्यास आकारावयाचा दंड याबाबत साकल्याने विचार करुन तसेच विद्यार्थ्यांनी याबाबतीत दिलेली निवेदने विचारात घेवून शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

१. (१) शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय अथवा दंत महाविद्यालयातून एमबीबीएस अथवा बीडीएस अभ्यासक्रमाचे शिक्षण घेवून पदवी प्राप्त केलेल्या उमेदवाराने त्यानंतर लगेच शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/सरंक्षण दलाची **एका वर्षाची सेवा** करणे अनिवार्य आहे. अशी शासन सेवा बजावण्यास जर उमेदवाराने नकार दिला अथवा कोणत्याही कारणास्तव कुचराई केली तर त्याच्याकडून दंड वसूल करण्यात येईल. शैक्षणिक वर्ष २००४-०५ ते २००७-०८ पर्यंत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी रुपये ५ लाख (अक्षरी रुपये पाच लाख) इतका आणि शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांसाठी **रुपये १० लाख** (अक्षरी रुपये दहा लाख) इतका दंड वसूल करण्यात येईल.

(२) पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर उमेदवारास अशी नियुक्ती देण्याच्या अनुषंगाने, संदर्भातील अनुक्रमांक-६ येथे नमूद केलेल्या शासन निर्णय दिनांक ३१ जुलै २००६ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(३) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रुजू (join) झालेल्या उमेदवारांसाठी संदर्भातील शासन निर्णय दिनांक ३१ जुलै २००६ मधील एक वर्ष सेवेची अट शिथिल करण्यात येत आहे.

२. (१) शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय अथवा दंत महाविद्यालयातून एम.डी./एम. एस./पदव्युत्तर पदविका अथवा दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेवून पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका प्राप्त केलेल्या उमेद्वाराने शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/सरंक्षण दलाची **एका वर्षाची सेवा** करणे अनिवार्य आहे. अशी

शासन सेवा बजावण्यास जर उमेदवाराने नकार दिला अथवा कोणत्याही कारणास्तव कुचराई केली तर त्याच्याकडून **रुपये १५ लाख** (अक्षरी रुपये पंधरा लाख) इतका दंड वसूल करण्यात येईल.

(२) पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर उमेदवारास नियुक्ती देण्याच्या संदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडील रिक्त जागा भरल्यानंतर, उर्वरित उमेदवारांची यादी संचालक, आरोग्य सेवा यांना पाठविण्यात येईल.

(३) अतिविशेषोपचार (सुपर स्पेशॅलिटी) अभ्यासक्रमासाठी रुजू झालेल्या उमेदवारांसाठी वरील २ (१) मधील १ वर्ष सेवेची अट शिथिल करण्यात येत आहे.

**३.** (१) शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय अथवा दंत महाविद्यालयातून अतिविशेषोपचार (सुपर स्पेशॅलिटी) पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षण घेवून सुपर स्पेशॅलिटी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवाराने शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/सरंक्षण दलाची **दोन वर्षाची** सेवा करणे अनिवार्य आहे. अशी शासन सेवा बजावण्यास जर उमेदवाराने नकार दिला अथवा कोणत्याही कारणास्तव कुचराई केली तर त्याच्याकडून **रुपये २५ लाख** (अक्षरी रुपये पंचविस लाख) इतका दंड वसूल करण्यात येईल.

(२) अतिविशेषोपचार पदविका/पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर वरील ३ (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे उमेदवारास नियुक्ती देण्याच्या संदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडील रिक्त जागा भरल्यानंतर, उर्वरित उमेदवाराची यादी संचालक, आरोग्य सेवा यांच्याकडे पाठविण्यात येईल.

४. शासन निर्णय क्र.एमईडी-१००६/सीआर-५/०६/शिक्षण-२, दि.३१ जुलै, २००६ नुसार, शासकीय व महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेस बसण्याकरिता पात्र ठरण्यासाठी विशिष्ट कालावधीची शासन सेवा शासकीय व महानगरपालिकेच्या महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवाराने पूर्ण केली असली पाहिजे अन्यथा बंधपत्रानुसार दंडाची रक्कम भरणे आवश्यक राहील, अशी घालण्यात आलेली अट या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

**५.** वरील परिच्छेद-२ (२) व ३ (२) येथील तरतुदीनुसार नियुक्ती दिलेला उमेदवार १५ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाला नाही तर, परिच्छेद-२ (१) व ३ (१) येथे नमूद केल्याप्रमाणे दंड वसूल करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण संबंधित अधिष्ठातांमार्फत कारवाई करण्यात येईल.

६. वरील परिच्छेद क्रमांक- (१), (२) व (३) येथील आदेश सध्या शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय अथवा दंत महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका, अतिविशेषोपचार (सुपरस्पेशॅलिटी) अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना लागू राहतील. सदर आदेश अखिल भारतीय प्रवेश परिक्षेद्वारे भरण्यात येणाऱ्या जागांवर आणि केंद्र शासनाद्वारे नामनिर्देशनाने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही लागू राहतील.

७. संचालक, आरोग्य सेवा यांनी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्याकडून वरील निर्णयात नमूद केल्याप्रमाणे नियुक्तीसाठी उमेदवारांच्या याद्या प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील रिक्त पदांवर सदर उमेदवारांना ३ महिन्यांच्या आत नियुक्ती द्यावी. सदर कालावधीत नियुक्ती देता येत नसल्यास त्यांनी अशा उमेदवारांची नांवे संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना कळवावीत, म्हणजे त्यांना बंधपत्रमुक्त करण्याबाबत त्यांच्याकडून कार्यवाही करण्यात येईल.

८. सदर निर्णयाची अंमलबजावणी पदवी अभ्यासक्रम व अतिविशेषोपचार (सुपरस्पेशॅलिटी) या अभ्यासक्रमासाठी सन २००८ पासून घेण्यात येणा-या सामाईक परीक्षांसाठी लागू करण्यात येत आहे. तसेच पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी हे आदेश सन २००९ पासून घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परीक्षांसाठी शासनाकडून घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परिक्षसाठी लागू करण्यात येत आहेत.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (www.maharashtra.gov.in) वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला असून त्याचा सांकेतांक २००८०२०८१७२२३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
( अमिताभ चंद्र)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (यांस प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह)
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालि, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (पत्राने)
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली (पत्राने)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (५ प्रती)
सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये/महानगरपालिकेची वैद्यकीय महाविद्यालये.
मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव
सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (शिक्षण-२)